मुख्य संपादक : नितीन ढाकणे । वृत्त संपादक : संतोष सानप । उपसंपादक : अमोल सुर्यवंशी । उप संपादक : अशोक दळवे । विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | सोमवार, 28 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 136 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# परळीत भरदिवसा खळबळ !

## परळी महावितरणचा कर्मचारी पंचांसमक्ष लाच स्वीकारताना रंगेहात पकडला

### .वीज बिल आणि मीटरच्या नावाखाली लाच मागणारा महावितरण कर्मचारी जालन्याच्या एसीबीच्या ताब्यात

### .वीज मीटर बसवण्यासाठी १३ हजारांची लाच! : वीज जोडणीसाठी लाचखोरी!

### .परळी महावितरणचा कर्मचारी पंचांसमक्ष लाच स्वीकारताना रंगेहात पकडला

### .जालना 'एसीबी'ची धडक कारवाई; वरिष्ठ तंत्रज्ञ अरुण गिते पंचांसमक्ष जेरबंद

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

नवीन विद्युत मीटर बसवून वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी १५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती १३ हजार रुपये स्वीकारताना महावितरण कंपनीतील वरिष्ठ तंत्रज्ञाला जालन्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहात पकडले. या धडक कारवाईमुळे परळीतील शासकीय व निमशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

आरोपी अरुण सुरेश गिते (वय ३१ वर्षे, रा. माऊली नगर, परळी) हा महावितरण कंपनी, परळी वैजनाथ येथे वरिष्ठ तंत्रज्ञ (वर्ग-४) या पदावर कार्यरत आहे. तक्रारदार यांचे घरचे विद्युत मीटर वीज बिल कट करून काढून नेण्यात आले होते. तक्रारदार MSEB ऑफिसात गेले असता, आरोपी अरुण गिते याने "तुमचे विद्युत मीटर फॉल्टी असून नवीन बसवून वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी १५,००० रुपये द्यावे लागतील" अशी लाचेची मागणी केली. त्यानंतर, २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजून १० वाजेच्या सुमारास जिरगे नगर डीपी जवळ, सापळा रचण्यात आला. तक्रारदाराकडून पंचांसमक्ष १३,००० रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारताना आरोपी अरुण गिते याला एसीबीच्या पथकाने रंगेहात ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलीस ठाणे परळी शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



### एसीबीचा सापळा आणि रंगेहात कारवाई _

■ तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लागलीच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (जालना) कडे लेखी तक्रार नोंदवली. एसीबी पथकाने केलेल्या पडताळणीदरम्यान आरोपीने १५ हजार रुपयांवरून तडजोडीअंती १३ हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले. ही यशस्वी कारवाई श्रीमती माधुरी कांगणे (पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग. छत्रपती संभाजीनगर) व शंतनू सिंगारे (अपर पोलीस अधीक्षक) यांच्या मार्गदर्शनाखाली बी. एस. जाधवर (पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. जालना) पो.ह. गजानन घायवट, मनोहर भुतेकर, गजानन कांबळे, शिवलिंग खुळे, व कापसे यांनी पार पाडली.

### जनतेस आवाहन




■ कोणताही शासकीय किंवा निमशासकीय अधिकारी/कर्मचारी कामासाठी लाचेची मागणी करत असल्यास नागरिकांनी न घाबरता तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी (ACB) संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## जायकवाडी प्रकल्पातून पाटोदा-शिरूरला 3 .57 टीएमसी पाणी ; उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षण पूर्ण

### धोंडे आणि आजबे स्वार्थासाठी एकमेका विरुद्ध लढले आणि मतलबासाठी एक झाले : आ .सुरेश धस यांचा घणाघात

■ आष्टी (प्रतिनिधी)

आमचे राजकीय विरोधक भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे हे विधानसभा निवडणूक स्वार्थासाठी एकमेकांच्या विरोधात लढले मात्र कार्यकर्ते न उरल्यामुळे स्वार्थासाठी ते आता एकत्र आले आहेत शासनाच्या विरोधात विरोधी पक्षाने मोर्चा काढण्या ऐवजी या दोघांनी मोर्चा काढून स्वतःचे हसे करून घेतले आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले

पत्रकारांशी अनौपचारिक बोलताना त्यांनी ही प्रतिक्रिया व्यक्त केली...

माजी आमदार भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे यांच्या आक्रोश मोर्चा बाबत पुढे बोलताना ते म्हणाले की दि.5 फेब्रुवारी 2025 रोजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे खुंटेफळ साठवण तलाव या ठिकाणी आले असता त्यांना आपण पाटोदा आणि शिरूर तालुक्यासाठी जायकवाडी प्रकल्पातून 3.57 टीएमसी पाणी आणण्यासाठी पाटोदा शिरूर कासार उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी सर्वेक्षणाचे आदेश द्यावेत अशी जाहीर मागणी केली होती आणि त्यापूर्वीच या विषयाचे दि.7 जानेवारी 2025 रोजी आपण पत्र दिल्यानंतर शासनाने दि.28 जानेवारी 20 25 रोजी जा.क्र. विकाक-/प्र.क्र.34/लपा या पत्रान्वये पाटोदा, शिरूर (कासार) आणि आष्टी तालुक्यातील काही गावातील सतत दुष्काळी छायेतील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनासाठी गोदावरी खोऱ्यातील पाणी उपलब्ध होण्यासाठी जायकवाडी प्रकल्पातून उपसा सिंचन योजनेसाठी सर्वेक्षण करणेबाबत मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले असून याबाबत तात्काळ कार्यवाही करावी असे आदेश कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजी नगर यांना देण्यात आले असून या पाटोदा शिरूर उपसा सिंचन योजनेचे सर्वेक्षण खाजगी संस्थेद्वारे करण्यात आले असून मी स्वतः त्यासाठी 27. 00 लक्ष रुपये खर्च केले आहेत शिरूर कासार भाजपा मंडळाध्यक्ष सुरेश उगलमुगले,पाटोदा मंडळाध्यक्ष भागवत येवले व माऊली जरांगे हे या कामासाठी अनेक दिवस प्रयत्नशील होते.



प्रत्यक्ष सर्वेक्षण सुरू असताना हे तिघे तर होतीच त्यांचं बरोबर माझे कार्यकर्ते देखील सर्वेक्षणादरम्यान उपस्थित राहून परिश्रम घेतले आहेत. या उपसासिंचन योजनेचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून लवकरच या कामास मंजुरी मिळणार असून आपण स्वतः ही मंजुरी मिळवण्यासाठी सक्षम आहोत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस याबाबत अत्यंत संवेदनशील असून त्यांनी वारंवार मराठवाड्यासाठी पाणी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले आहे हे सर्व माहीत असताना देखील भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे यांनी मोर्चाचे नाटक केले आहे या मोर्चाच्या बॅनर वर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोघांचे फोटो लावण्याचे काहीही कारण नाही त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचा फोटो लावून त्यांच्याच विरोधात मोर्चा काढावा असे सांगत ते पुढे म्हणाले की, आष्टी विधानसभा निवडणुकीमध्ये महायुती अस्तित्वात नव्हती भीमराव धोंडे हे महायुतीच्या उमेदवाराच्या विरोधात अपक्ष उमेदवार होते तर बाळासाहेब आजबे हे महायुतीचे असून देखील त्यांच्या पक्षाच्या तिकिटावर माझ्याविरुद्ध लढले आहेत दोघांचाही दारुण पराभव झाला आता कार्यकर्ते न उरल्यामुळे ते एकत्र आले आहेत म्हणजेच स्वार्थासाठी एकमेकांविरुद्ध लढले आणि मतलबासाठी एक झाले अशी मिश्कील टिपणी त्यांनी शेवटी केली



## अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचा पदग्रहण समारंभ डॉक्टरांनी आपल्या आरोग्याप्रती सजग असावे : डॉ .आनंद वैद्य

### संघटना समाजाभिमुख हवी : डॉ.राजेश इंगोले

■ अंबाजोगाई प्रतिनिधी

येथील अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशनच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ नुकताच आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.आनंद वैद्य तर प्रमुख अतिथी म्हणून वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, महाराष्ट्र डेंटल कौन्सिलचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, डॉ.दिनकर राऊत, प्रा. रवींद्र पाठक, प्रा.विजयकुमार बिदरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलनाने व धन्वंतरी पूजनाने झाली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना पदभार देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संघटनेचे नवनिर्वाचित सचिव बालरोग तज्ज्ञ डॉ.संदीप जोगदंड यांनी सांगितले की, संघटनेला बळकटी देऊन संघटनेच्या सर्व सदस्यांना एकत्रित करून संघटना ही समाजाभिमुख करण्याचा नवीन कार्यकारणीचा प्रयत्न राहील तसेच संघटनेच्या सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक निर्णय घेतले जातील असे प्रतिपादन डॉ.जोगदंड यांनी केले. तर अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे यांनी इंडियन मेडिकल असोसिएशन व अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशन यांनी सरकारी दवाखान्यांमध्ये मनुष्यबळ कमी पडत असल्यामुळे आपली सेवा द्यावी असे आवाहन केले. तसेच आय.एम.एने सरकारी रूग्णालयांमध्ये डॉक्टरांवर होणाऱ्या अन्यायाबाबत हस्तक्षेप करीत पाठिंबा द्यावा अशी विनंती केली. याप्रसंगी इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी नेहमीप्रमाणेच आपल्या जोशपूर्ण भाषणामध्ये अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन येणाऱ्या आगामी काळामध्ये नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे निश्चितपणे एका वेगळ्या उंचीवर जाईल असे सांगितले. नव्यांचा जोश आणि जुन्यांचा होश यामुळे संघटनेला निश्चितपणे सकारात्मक दिशा मिळेल आणि संघटनेद्वारे भविष्यामध्ये अनेक चांगले उपक्रम राबविण्यात येतील अशी अपेक्षा व्यक्त केली. संघटनेने सर्व डॉक्टर्स मध्ये समन्वय साधून हे सर्व डॉक्टर समाजाभिमुख कसे होतील एकमेकांच्या सुखदुःखामध्ये कसे सहभागी होतील आणि यांची नाळ एकमेकांशी कशी जोडली जाईल याबाबत विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. संघटनेमार्फत डॉक्टर्ससाठी विविध सांस्कृतिक कला क्रीडा कार्यक्रम तसेच अकॅडमी वैद्यकीय परिषदा नूतन कार्यकारणीने घ्याव्या तसेच समाजासाठी विविध आरोग्य शिबीर, व्यसनमुक्ती शिबिरे आरोग्य जनप्रबोधन शिबिरे आयोजित करावी असे सुचविले. या कामी जी काही मदत लागेल ती आम्ही करू असे आश्वासन डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी दिले. डॉ.नरेंद्र काळे यांनी संघटनेमध्ये वैयक्तिक हेवेदावे न ठेवता सर्व सदस्यांनी एकत्रितपणे मिळून संघटनेचे कार्य करावे आणि संघटनेला नांवारूपाला आणावे अशी अपेक्षा व्यक्त केली. केज आय.एम.एचे अध्यक्ष डॉ.दिनकर राऊत यांनी अंबाजोगाई येथे सर्व पॅथीचे डॉक्टर्स मिळून गुण्यागोविंदाने एक संघटना चालवतात, विविध उपक्रम राबवतात, एकमेकांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होतात ही मनाला समाधान देणारी गोष्ट असल्याचे सांगत ही परंपरा जपली गेली पाहिजे असे आवाहन उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.आनंद वैद्य यांनी डॉक्टरचे आपल्या दैनंदिन वैद्यकीय सेवेमध्ये इतके व्यस्त असतात की, त्यांना स्वतःच्या आरोग्याकडे स्वतःच्या प्रकृतीकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. आणि निरोगी स्वास्थ्य ही जीवनाची खरी संपत्ती आहे हे उमगेपर्यंत वेळ निघून गेलेली असते. त्यामुळे प्रत्येक डॉक्टरने आपल्या आयुष्यामध्ये आपल्यासाठी वेळ काढून निरोगी शरीर निरोगी मन आणि उत्तम भावनिकता राखण्यासाठी विविध प्रकारचे व्यायाम ध्यान साधना नियमितपणे केली पाहिजे असे प्रतिपादन केले. यावेळी ऍम्पाच्या माजी अध्यक्ष डॉ.सुलभा पाटील व माजी सचिव डॉ.ऋषिकेश घुले यांनी नूतन अध्यक्ष निशिकांत पाचेगावकर व नूतन सचिव डॉ.संदीप जोगदंड यांना पदभार दिला. यावेळी डॉ.प्रिया मुळे, डॉ.अस्लम खान, डॉ.वेणू गोपाल आगळे, डॉ.स्नेहल पेस्टे, डॉ.इम्रान पटेल, डॉ.स्वाती हारे, डॉ.प्रवीण जोशी, या नूतन पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदांचा कार्यभार स्वीकारला.

# माहितीचा अधिकार : लोकशाहीची पारदर्शक खिडकी : डॉ. राजेंद्र बगाटे

**लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा अधिकार नव्हे, तर शासनाच्या कारभाराविषयी जाणून घेण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि सार्वजनिक संस्थांकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करण्याचा नागरिकांचा अधिकारही होय. शासनाच्या निर्णयांची माहिती नागरिकांपासून दूर राहिली, सार्वजनिक निधीच्या वापराबाबत पारदर्शकता राहिली नाही आणि प्रशासनाच्या कामकाजाविषयी प्रश्न विचारण्याची संधी मर्यादित झाली, तर लोकशाहीची प्रक्रिया केवळ औपचारिक ठरू शकते. म्हणूनच लोकशाहीमध्ये माहितीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नागरिकांना माहिती उपलब्ध करून देणे म्हणजे त्यांना केवळ कागदपत्रे देणे नव्हे, तर सार्वजनिक जीवनात अधिक अर्थपूर्ण सहभागाची संधी देणे होय. याच व्यापक संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित करणारा २८ सप्टेंबर हा 'आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन' म्हणून जगभर पाळला जातो.**

संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटनेने म्हणजेच युनेस्कोने माहितीच्या सार्वत्रिक प्रवेशाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी २८ सप्टेंबर हा दिवस निश्चित केला. पुढे संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनेही या दिवसाला आंतरराष्ट्रीय मान्यता दिली. माहितीपर्यंत समान आणि प्रभावी प्रवेश हा शाश्वत विकास, लोकशाही सहभाग, सामाजिक समावेशन आणि मानवी हक्कांच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे या दिवसाच्या निमित्ताने अधोरेखित केले जाते. माहिती ही आजच्या ज्ञानाधारित समाजातील मूलभूत सामाजिक संपत्ती बनली आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक धोरणे अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रात योग्य वेळी मिळणारी अचूक माहिती व्यक्तीच्या निर्णयक्षमतेवर परिणाम करते.

भारताच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५' हा भारतीय लोकशाहीच्या वाटचालीतील महत्त्वाचा कायदा मानला जातो. या कायद्याचा मुख्य उद्देश सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखाली असलेल्या माहितीपर्यंत नागरिकांना प्रवेश उपलब्ध करून देणे आणि शासनव्यवस्थेत पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढविणे हा आहे. सार्वजनिक कामकाजात पारदर्शकता वाढल्यास नागरिकांना शासनाच्या निर्णयांची प्रक्रिया समजून घेणे, सार्वजनिक निधीचा वापर तपासणे आणि प्रशासनाकडून अपेक्षित उत्तर मागणे अधिक सुलभ होते. त्यामुळे माहितीचा अधिकार हा प्रशासनावरील अविश्वासाचे प्रतीक नसून लोकशाहीतील उत्तरदायित्वाची संस्थात्मक व्यवस्था म्हणून पाहणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार नागरिकाला शासनाच्या दैनंदिन कामकाजाशी जोडतो. एखाद्या गावात रस्ता बांधण्यासाठी निधी मंजूर झाला असेल, पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली असेल, शासकीय इमारतीचे बांधकाम झाले असेल किंवा एखाद्या कल्याणकारी योजनेची अंमलबजावणी सुरू असेल, तर त्या कामाशी संबंधित उपलब्ध अधिकृत नोंदींबाबत नागरिक माहिती मागू शकतो. मंजुरीचे आदेश, खर्चाशी संबंधित नोंदी, कामाची प्रगती, उपलब्ध अहवाल किंवा कायद्याच्या चौकटीत येणारी इतर माहिती नागरिकांसाठी सार्वजनिक उत्तरदायित्वाचा आधार बनू शकते. अशा प्रक्रियेमुळे 'शासन काय करते?' हा प्रश्न केवळ चर्चेचा विषय न राहता अधिकृत नोंदींच्या आधारे तपासता येण्याजोगा ठरतो.

या कायद्याचे महत्त्व विशेषतः ग्रामीण भारताच्या संदर्भात अधोरेखित होते. गावातील नागरिकांना पाणी, रस्ते, वीज, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, रोजगार, घरकुल, सामाजिक सुरक्षा आणि विविध शासकीय योजनांशी संबंधित अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. एखादी योजना कागदावर उपलब्ध असली, तरी तिची माहिती प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली नाही तर त्या योजनेचा अपेक्षित सामाजिक परिणाम मर्यादित राहू शकतो. त्यामुळे शासनाच्या योजना आणि नागरिक यांच्यामधील माहितीची दरी कमी करणे आवश्यक आहे. स्थानिक भाषेत, सोप्या स्वरूपात आणि सहज उपलब्ध माध्यमातून माहिती देणे हे प्रशासनाच्या लोकाभिमुखतेचे महत्त्वाचे लक्षण ठरते.

माहितीचा अधिकार सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि शिक्षित व्यक्तींना कार्यालयीन प्रक्रिया समजून घेणे तुलनेने सोपे असते; परंतु ग्रामीण, आदिवासी, वंचित, महिला, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसमोर माहितीपर्यंत पोहोचण्याची अतिरिक्त आव्हाने असू शकतात. माहितीचा अधिकार या नागरिकांना आपल्या हक्कांबाबत प्रश्न विचारण्यासाठी कायदेशीर चौकट उपलब्ध करून देतो. मात्र कायदा अस्तित्वात असणे पुरेसे नाही. माहितीचा अधिकार प्रभावी होण्यासाठी नागरिकांना या कायद्याची जाणीव, अर्ज करण्याची प्रक्रिया, संबंधित सार्वजनिक



प्राधिकरणाची माहिती आणि अपीलच्या तरतुदी याबाबत मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे.

माहितीच्या अधिकारामुळे नागरिक आणि शासन यांच्यातील नात्यातही बदल घडतो. नागरिक हा केवळ शासकीय योजनांचा लाभार्थी नसून सार्वजनिक कारभाराविषयी प्रश्न विचारणारा घटक आहे, ही जाणीव अधिक दृढ होते. लोकशाहीत लोकप्रतिनिधी निवडून देणे ही नागरिकांची महत्त्वाची भूमिका असली, तरी त्यानंतरही सार्वजनिक जीवनातील नागरिकांचा सहभाग सुरू राहतो. विकासकामांची माहिती घेणे, सार्वजनिक सेवांबाबत प्रश्न उपस्थित करणे, उपलब्ध योजनांचा अभ्यास करणे आणि सार्वजनिक संस्थांकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करणे हा लोकशाही सहभागाचाच भाग आहे. माहितीचा अधिकार या सहभागाला कायदेशीर आधार देतो.

या अधिकाराचा वापर करताना त्याची कायदेशीर चौकट समजून घेणे तितकेच आवश्यक आहे. प्रत्येक प्रकारची माहिती कोणत्याही परिस्थितीत सार्वजनिक करता येते, असे नाही. राष्ट्रीय सुरक्षा, काही संवेदनशील प्रशासकीय बाबी, वैयक्तिक गोपनीयता आणि कायद्यात नमूद केलेल्या इतर बाबींना काही परिस्थितीत अपवाद लागू होतात. त्यामुळे माहितीचा अधिकार हा अमर्यादित स्वरूपाचा अधिकार नसून कायद्याने निश्चित केलेल्या चौकटीत वापरला जाणारा अधिकार आहे. पारदर्शकता आणि गोपनीयता, सार्वजनिक हित आणि वैयक्तिक हक्क यांच्यात संतुलन राखणे ही आधुनिक लोकशाहीसमोरील महत्त्वाची गरज आहे.

डिजिटल क्रांतीमुळे माहितीपर्यंत पोहोचण्याची साधने मोठ्या प्रमाणात बदलली आहेत. आज शासनाच्या संकेतस्थळांवर विविध योजना, अधिसूचना, अहवाल, अंदाजपत्रके आणि सार्वजनिक माहिती उपलब्ध होत आहे. ऑनलाइन सेवा आणि डिजिटल नोंदींमुळे नागरिकांचा वेळ वाचतो आणि कार्यालयीन प्रक्रियेवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी होते. परंतु डिजिटल माध्यमे उपलब्ध आहेत म्हणून माहितीचा समान प्रवेश सुनिश्चित झाला,




असे म्हणता येत नाही. इंटरनेटची उपलब्धता, डिजिटल साक्षरता, भाषेची अडचण, तांत्रिक कौशल्याचा अभाव आणि डिजिटल साधनांची मर्यादित उपलब्धता यामुळे समाजातील काही घटक अजूनही माहितीच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहू शकतात.

म्हणूनच माहितीचा सार्वत्रिक प्रवेश म्हणजे केवळ माहिती इंटरनेटवर ठेवणे नव्हे. माहिती अचूक, अद्ययावत, समजण्यास सोपी, शोधण्यास सुलभ आणि विविध सामाजिक घटकांसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. विशेषतः दिव्यांग व्यक्तींसाठी सुलभ डिजिटल संकेतस्थळे, ग्रामीण नागरिकांसाठी स्थानिक भाषेतील माहिती आणि डिजिटल साधनांपासून दूर असलेल्या नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. माहितीच्या लोकशाहीकरणाचा खरा अर्थ समाजातील प्रत्येक घटकाला माहितीच्या प्रवाहात सहभागी करून घेण्यात आहे.

आज माहितीच्या उपलब्धतेबरोबरच माहितीच्या विश्वासार्हतेचा प्रश्नही महत्त्वाचा झाला आहे. सामाजिक माध्यमांमुळे माहितीचा प्रसार अभूतपूर्व वेगाने होत असला, तरी त्यातील प्रत्येक माहिती अचूक असेलच असे नाही. चुकीची माहिती, अपूर्ण माहिती, संदर्भहीन माहिती किंवा दिशाभूल करणारे संदेश समाजात वेगाने पसरू शकतात. त्यामुळे माहिती मिळविणे जितके आवश्यक आहे, तितकेच तिची सत्यता तपासणेही आवश्यक आहे. अधिकृत सरकारी संकेतस्थळे, कायदेशीर दस्तऐवज, मान्यताप्राप्त संस्थांचे अहवाल आणि विश्वसनीय माध्यमे यांचा संदर्भ घेण्याची सवय नागरिकांमध्ये विकसित होणे गरजेचे आहे. माहितीच्या अधिकाराबरोबरच माध्यम साक्षरता आणि डिजिटल साक्षरता हीदेखील आधुनिक नागरिकत्वाची आवश्यक कौशल्ये बनली आहेत.

प्रशासनाच्या पातळीवरही मोठ्या बदलांची आवश्यकता आहे. नागरिकांनी प्रत्येक मूलभूत माहितीसाठी स्वतंत्र अर्ज करावा लागणे ही पारदर्शक प्रशासनाची आदर्श स्थिती नाही. सार्वजनिक संस्थांनी कायद्यातील तरतुदींनुसार आवश्यक माहिती स्वयंस्फूर्तीने आणि नियमितपणे उपलब्ध करून देण्याची संस्कृती विकसित केली पाहिजे. विकासकामे, सार्वजनिक निधीचा वापर, विविध योजना, निविदा, सेवा वितरण, कार्यालयीन जबाबदाऱ्या आणि नागरिकांसाठी आवश्यक असलेली मूलभूत माहिती सहज उपलब्ध झाली, तर प्रशासनाविषयीचा विश्वास वाढण्यास मदत होऊ शकते. माहिती लपविण्यापेक्षा माहिती सहज उपलब्ध करून देणे ही आधुनिक लोकशाही प्रशासनाची दिशा असली पाहिजे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर माहितीचा अधिकार अधिक प्रभावी ठरू शकतो. ग्रामपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित संस्था आहेत. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, सार्वजनिक प्रकाशयोजना, आरोग्य सुविधा, स्थानिक कर आणि विविध विकासकामांबाबत नागरिकांना माहिती उपलब्ध झाली, तर स्थानिक लोकशाही अधिक सक्रिय होऊ शकते. ग्रामसभा किंवा स्थानिक सार्वजनिक चर्चांमध्ये अधिकृत माहितीचा वापर केल्यास विकासाच्या प्राधान्यक्रमांवर अधिक माहितीपूर्ण चर्चा होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे माहितीचा अधिकार हा केवळ व्यक्तीचा कायदेशीर अधिकार नसून स्थानिक लोकशाही मजबूत करण्याचे साधनही आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठीही माहितीची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, रोजगार, स्वयंरोजगार, स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला-केंद्रित योजनांबाबत योग्य माहिती उपलब्ध झाल्यास महिलांना उपलब्ध संधी आणि हक्कांची जाणीव होऊ शकते. त्याचप्रमाणे आदिवासी आणि दुर्गम भागातील समुदायांना त्यांच्या भाषेत आणि त्यांच्या सामाजिक परिस्थितीला अनुरूप माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. माहितीची भाषा आणि स्वरूप हेही सामाजिक समावेशनाचे महत्त्वाचे घटक आहेत.

माहितीचा अधिकार जबाबदारीने वापरणे हे नागरिकांचेही कर्तव्य आहे. माहिती मागण्याचा अधिकार हा लोकशाहीतील महत्त्वाचा अधिकार असला, तरी त्याचा वापर सार्वजनिक हित, पारदर्शकता आणि कायदेशीर हक्कांच्या चौकटीत होणे आवश्यक आहे. स्पष्ट आणि विशिष्ट माहिती मागितल्यास प्रशासनालाही अपेक्षित माहिती शोधून देणे अधिक सुलभ होते. मिळालेल्या माहितीचा संदर्भ समजून घेणे, तिची सत्यता तपासणे आणि आवश्यक असल्यास कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. अधिकार आणि जबाबदारी यांचा समतोल राखल्यास माहितीचा अधिकार अधिक प्रभावी लोकशाही साधन ठरतो.

माहितीच्या अधिकाराची खरी ताकद केवळ किती अर्ज दाखल झाले किंवा किती माहिती मिळाली यामध्ये नाही; तर माहितीमुळे नागरिकांच्या सार्वजनिक सहभागात किती वाढ झाली, प्रशासन अधिक पारदर्शक झाले का आणि सार्वजनिक संस्थांची उत्तरदायित्वाची संस्कृती किती मजबूत झाली, यामध्ये आहे. माहितीच्या आधारे नागरिकांनी प्रश्न विचारले, प्रशासनाने स्पष्ट उत्तरे दिली आणि सार्वजनिक संस्थांनी आपल्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणली, तर माहितीचा अधिकार लोकशाहीच्या दैनंदिन व्यवहाराचा प्रभावी भाग बनतो.

२८ सप्टेंबरचा आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन आपल्याला याच मूलभूत सत्याची आठवण करून देतो की, माहितीपासून वंचित नागरिकाचा लोकशाही सहभाग मर्यादित होऊ शकतो. माहिती उपलब्ध झाली, समजली आणि तिचा योग्य वापर करण्याची क्षमता निर्माण झाली, तर नागरिक अधिक सक्षम होतो. त्यामुळे माहितीचा अधिकार हा केवळ सरकारी कागदपत्रे मिळविण्याचा मार्ग नाही; तो नागरिकांच्या आत्मविश्वासाचा, सार्वजनिक सहभागाचा आणि लोकशाही उत्तरदायित्वाचा आधार आहे.

आजच्या काळात शासन, तंत्रज्ञान आणि नागरिक यांच्यातील संबंध वेगाने बदलत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल प्रशासन, सामाजिक माध्यमे आणि मोठ्या प्रमाणातील माहिती यामुळे नव्या संधी निर्माण झाल्या आहेत, तसेच गोपनीयता, माहितीची सत्यता आणि डिजिटल विषमता यांसारखी आव्हानेही पुढे आली आहेत. या बदलत्या परिस्थितीत माहितीच्या अधिकाराची मूलभूत भावना अधिक महत्त्वाची ठरते कि सार्वजनिक जीवनाशी संबंधित आवश्यक माहिती नागरिकांपासून अनावश्यकपणे दूर राहू नये.

लोकशाहीची खरी शक्ती जागरूक नागरिकांमध्ये असते. जागरूकतेचा पाया माहितीमध्ये आहे आणि माहितीचा अधिकार त्या पायाला कायदेशीर बळ देतो. शासनाने पारदर्शकतेची संस्कृती विकसित करणे, प्रशासनाने नागरिकांना वेळेत आणि सुलभ माहिती उपलब्ध करून देणे आणि नागरिकांनी मिळालेल्या माहितीचा जबाबदारीने वापर करणे, या तिन्ही बाबी एकत्र आल्या तर लोकशाही अधिक सहभागी आणि उत्तरदायी होऊ शकते. म्हणूनच २८ सप्टेंबर हा दिवस केवळ माहितीच्या अधिकाराची आठवण करून देणारा दिवस नसून 'माहिती ही नागरिकशक्ती आहे' हा लोकशाहीचा मूलभूत संदेश अधोरेखित करणारा दिवस आहे. माहितीची दारे खुली असतील, प्रश्न विचारण्याची मुभा असेल आणि उत्तरदायित्वाची संस्कृती बळकट असेल, तरच लोकशाहीचा प्रवास अधिक व्यापक, समावेशक आणि अर्थपूर्ण होईल.

■ डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

## संपादकीय

### मुंबई गुदमरतेय...

सात बेटांचे शहर असलेली मायानगरी मुंबई ही केवळ देशाची आर्थिक राजधानीच नाही, तर लाखो लोकांसाठी त्यांची स्वप्नं पूर्ण करणारी एक स्वप्ननगरी आहे. देशाच्या कानाकोपऱ्यांतून नागरिक उदरनिर्वाहासाठी इथे येतात आणि अनेकजण कायमचे इथलेच होऊन जातात. आता एवढ्या मोठ्या प्रमाणात ज्या शहरात लोकं येतात, तिथे त्या प्रमाणात सोयी-सुविधाही असायलाच हव्यात, हेही तितकेच खरे. पण, या सोयी-सुविधा पुरविण्यासाठी आणि शहराला जागतिक दर्जाचे 'हाय-फाय' शहर बनविण्यासाठी विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा जो काही ऱ्हास सुरू आहे, त्याचे दुष्परिणाम आता दिसायला सुरुवात झाली आहे.

गेल्या काही वर्षांत शहराचा वेगवान विकास, बेसुमार काँक्रिटीकरण आणि हवामान बदलामुळे येथील पर्यावरण आणि नागरिकांच्या सुरक्षेवर थेट परिणाम होऊ लागला आहे. या धोक्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी 'क्लायमेट ॲक्शन नाऊ' ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेच्या केंद्रस्थानी तीन गंभीर मुद्दे आहेत — झाडे आणि खारफुटीची कत्तल, अति-काँक्रिटीकरण आणि वाढती उष्णता.सध्या मुंबई महानगर प्रदेशात विविध विकासकामे युद्धपातळीवर सुरू आहेत. आधीच मुंबईत जागेची कमतरता असल्यामुळे या विकासकामांच्या मार्गात येणारी झाडे तोडण्याचा सपाटा सुरू झालाय आणि हे कमी म्हणून की काय, तर आता मुंबईचे नैसर्गिक बचाव कवच असलेली खारफुटी हटवण्याचेही प्रयत्न सुरू झाले आहेत.खारफुटी ही काही केवळ झाडे नाहीत. ती मुंबई आणि ठाणे किनारपट्टीसाठी नैसर्गिक सुरक्षा कवच आहेत. भरतीच्या लाटा, चक्रीवादळ, किनारपट्टीची धूप आणि पूर यांपासून शहराचे रक्षण करण्याचे काम खारफुटीची झाडे करतात. सामान्य जंगलाच्या तुलनेत खारफुटी पाचपट अधिक कार्बन डायऑ-क्साईड शोषून घेतात आणि त्यांना वाढण्यासाठी सुमारे १०० वर्षे लागतात.  मात्र आता विकासाच्या नावाखाली त्यांची मोठ्या प्रमाणावर कत्तल सुरू झाली आहे. वर्सोवा-भाईंदर किनारी रस्त्यासाठी तब्बल ४५,६७५ खारफुटीची झाडे तोडण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी डहाणू ते आंबेसरी दरम्यान ८४७ खारफुटीची झाडे तोडण्याची परवानगी मागणाऱ्या याचिकेवर नुकतीच मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली.१४ जुलै रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमू-र्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालय म्हणाले, "मुंबईत आधीच ऑक्सिजन कमी आहे. जर हिरवे आवरण असेच कमी होत राहिले, तर तो दिवस दूर नाही जेव्हा लोकांना ऑक्सिजनचे शॉट घेण्यासाठी ऑक्सिजन सिलिंडर घेऊन फिरावे लागेल."भरपाई वनीकरणाच्या ढिसाळपणावरही न्यायालयाने बोट ठेवले. "तुम्ही फक्त झाडे लावल्याचे चित्र तयार करता. ती जिवंत आहेत की नाही हे पाहायला तुम्ही मागे वळून पाहत नाही,"

## पिक विमा वाटपातील दिरंगाईचे कारण सरकारने स्पष्ट करावे : वसंत मुंडे

### २०20 पासून शेतकऱ्यांना नियमानुसार पिक विमा मिळाला नसल्याचा आरोप : चौकशी समिती नेमण्याची मागणी

■ **परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम वाटप करण्यास होत असलेल्या दिरंगाईचे कारण स्पष्ट करावे, अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. सन २०२० पासून आजपर्यंत अनेक शेतकऱ्यांना नियमानुसार पिक विम्याचा लाभ मिळाला नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

वसंत मुंडे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, न्यायालयीन निर्णय तसेच शासनाचे आदेश असतानाही काही पिक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांच्या निकषानुसार विमा वाटप करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे निदर्शनास येत आहे. अतिवृष्टी, दुष्काळ आणि अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे २०२० ते २०२६ या कालावधीत शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, त्यानुसार विमा भरपाई मिळण्यात दिरंगाई होत असल्याचा दावा त्यांनी केला.

पिक विमा योजनेत खासगी विमा कंपन्यांचा सहभाग आणि त्यांना दिल्या जाणाऱ्या कमिशनच्या पद्धतीवरही वसंत मुंडे यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.



विमा कंपन्या, संबंधित अधिकारी आणि काही लोकप्रतिनिधी यांच्या संगनमतामुळे शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळण्यात अडथळे निर्माण होत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

पर्जन्यमापक यंत्रणा, हवामान केंद्रांचे अहवाल आणि पीक नुकसानीच्या नोंदी यामध्ये अनियमितता होत असल्याचा आरोपही मुंडे यांनी केला आहे. संबंधित यंत्रणांच्या अहवालांची सखोल तपासणी करून शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा पिक विमा मिळवून देण्याची मागणी त्यांनी केली. पिक विमा कंपन्या, संबंधित अधिकारी तसेच आजी-माजी लोकप्रतिनिधी यांच्या भूमिकेची चौकशी करण्यासाठी सर्व स्तरावर चौकशी समिती नियुक्त करावी आणि चौकशीत दोष आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली आहे. तसेच, पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार पिक विम्याची रक्कम तातडीने वितरित करण्याचे आदेश केंद्र व राज्य सरकारने द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

## मैदान जिंकलंस भावा! वेस्ट इंडिजविरूद्धच्या पहिल्या वन डे सामन्यामध्ये भारताचा दणदणीत विजय

■ **नवी दिल्ली: वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजविरूद्धच्या पहिल्या वन डे सामन्यामध्ये भारताने 300 रनमध्ये 8 विकेटमध्ये सामना जिंकला आहे. रोहित शर्मा, विराट कोहली आणि शुबमन गिलच्या जबरदस्त खेळीने भारताने पहिला वनडे सामना जिंकला आहे. भारतासमोर विजयासाठी वेस्ट इंडिजने 296 धावांचं आव्हान ठेवलं होतं. या धावांचा पाठलाग करताना कर्णधार शुभमन गिल आणि रोहित शर्मा यांनी आक्रमक सुरूवात केली. यांच्या खेळीने संपूर्ण क्रिकेट स्टेडिअमचं लक्ष वेधून घेतलं होतं. या वनडे मॅचमध्ये विराट कोहलीने 15 हजार धावा करणारा दुसरा फलंदाज ठरला आहे.

नागोया, जपान : आशियाई क्रीडा स्पर्धा 2026 (Asian Games 2026) मधून भारतासाठी एक अभिमानास्पद पण किंचित निराश करणारी बातमी समोर आली आहे. जपानमधील नागोया किंजो फुतो ...

वनडे क्रिकेट सामन्यामध्ये मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरनंतर विराट कोहली 15 हजार धावा करणारा दुसरा फलंदाज ठरला आहे. या वनडे सामन्यात विराटने शतक पूर्ण केलं आहे. दरम्यान, मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने 463 वनडे सामन्यात 18426 धावांची खेळी केली आहे. आता त्या नंतर विराट कोहलीचं नाव आलं आहे. वेस्ट इंडिजविरूद्धच्या सामन्यात त्याने 15 हजार धावांचा पल्ला गाठला आहे. दरम्यान, शुबमन गिल 74 धावांवर, त्यानंतर रोहित शर्मा 32 धावांवर तर विराट कोहलीने आणि ऋतुराज गायकवाडने आपल्या जबरदस्त खेळीने मॅचची संपूर्ण खिंड लढवली आहे. दरम्यान, विराट कोहलीने 88 बॉलमध्ये 139 रन बनवले आहेत. तर त्याने मॅचमध्ये 10 चौकार आणि 9 षटकार मारले आहेत. तर, ऋतुराज गायकवाडने 19 चेंडूंमध्ये 13 धावा बनवल्या आहेत.



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# 'हम साथ साथ हैं' दाखविण्यासाठीच आक्रोश मोर्चा; आ. सुरेश धसांचा धोंडे-आजबेंवर निशाणा

## राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठीच मोर्चा; पाटोदा-शिरूरच्या पाण्यासाठी 3.57 टीएमसीचे सर्वेक्षण पूर्ण

**आष्टी (प्रतिनिधी)**



विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी माजी आमदार भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे एकत्र आले असून, आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे, असा आरोप आमदार सुरेश धस यांनी केला. शासनाच्या विरोधात काढण्यात येणाऱ्या या मोर्चात आष्टी विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी सहभागी होऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले.

आष्टी तालुक्यातील राजकीय विरोधक असलेल्या माजी आमदार भीमराव धोंडे आणि बाळासाहेब आजबे यांच्या आक्रोश मोर्चाच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत आमदार धस बोलत होते. यावेळी शिरूर कासार तालुका भाजपाध्यक्ष सुरेश उगलमुगले आणि पाटोदा मंडळाध्यक्ष भागवत येवले उपस्थित होते.

आमदार धस म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत भीमराव धोंडे यांनी बंडखोरी करून अपक्ष म्हणून, तर बाळासाहेब आजबे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवली. या निवडणुकीत दोघांचाही पराभव झाला. आता राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी दोघे एकत्र आले असून, 'हम साथ साथ हैं' हे दाखविण्यासाठीच हा मोर्चा काढण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील गावांसह आष्टी तालुक्यातील काही दुष्काळी गावांना शाश्वत सिंचनासाठी गोदावरी खोऱ्यातील पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे धस यांनी सांगितले. दि. ७ जानेवारी २०२५ रोजी जायकवाडी प्रकल्पातून उपसा सिंचन योजनेसाठी सर्वेक्षण करण्याची मागणी शासनाकडे केली होती. त्यानंतर दि. २८ जानेवारी २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वेक्षणाचे निर्देश दिले. त्यानुसार गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून पुढील कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी खुंटेफळ साठवण तलावाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पाटोदा व शिरूरच्या पाण्याची मागणी प्रत्यक्ष केली होती, असेही त्यांनी सांगितले.

पाटोदा-शिरूर कासार उपसा सिंचन योजनेअंतर्गत जायकवाडी प्रकल्पातून 3.57 टीएमसी पाणी उचलून सुमारे 20 हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजन आहे. या योजनेचे खाजगी सर्वेक्षण संस्थेच्या माध्यमातून सुमारे 27 लाख रुपये खर्च करून सर्वेक्षण पूर्ण झाले असून, योजनेच्या मंजुरीसाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. गहिनीनाथ गड परिसरात वितरण व्यवस्था उभारून बंदिस्त नलिकेद्वारे विविध भागांत पाणी पोहोचविण्याचे नियोजन आहे. या सर्वेक्षणाच्या वेळी पाटोदा व शिरूरचे दोन्ही मंडळाध्यक्ष तसेच प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्वेक्षणाचे चित्रीकरणही सर्वत्र व्हायरल झाले असून, त्यावरून संभ्रम निर्माण केला जात असल्याचे धस यांनी सांगितले. पिंपळवंडी, पाटोदा, रोहतवाडी, थेरला आदी भागांत पाणी साठवणुकीची व्यवस्था करण्याचे नियोजन असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी पत्रकार परिषदेत दोन्ही मंडळाध्यक्षांनी सर्वेक्षणाचे चित्रीकरण दाखवत हा मोर्चा नेमका कशासाठी काढण्यात येत आहे, याबाबत प्रश्न उपस्थित केला. पाटोदा व शिरूर कासार तालुक्याच्या पाण्याच्या प्रश्नासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असताना मोर्चाच्या माध्यमातून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

महायुतीचे घटक पक्ष असल्याचे सांगायचे, शासनाकडून विकासकामांसाठी निधी मागायचा आणि त्याच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे फोटो मोर्चाच्या पोस्टरवर लावून शासनाचा निषेध करायचा, ही भूमिका योग्य नाही, अशी टीकाही आमदार धस यांनी केली. पाटोदा आणि शिरूरच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असून, दोन्ही माजी आमदारांनी या प्रश्नाची चिंता करण्याची आवश्यकता नाही. जिल्हाधिकारी तसेच गोदावरी खोरे महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे चकरा मारण्यापेक्षा योजनेची वस्तुस्थिती समजून घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

शिरूर कासार तालुका भाजपाध्यक्ष सुरेश उगलमुगले यांनीही मोर्चावर टीका केली. पाटोदा व शिरूर कासार तालुक्याच्या पाण्याच्या प्रश्नासाठी आयोजित मोर्चात आष्टी तालुक्यातील कार्यकर्त्यांना कशासाठी सहभागी करून घेतले जात आहे, हा प्रश्न महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. माजी आमदार भीमराव धोंडे यांचा शाळा वाचविणे व कारखाना सुरू करणे, तर माजी आमदार बाळासाहेब आजबे यांचा आगामी राजकीय वाटचालीचा मुद्दा असल्याचे दिसून येते, असा दावा उगलमुगले यांनी केला. मोर्चाच्या पोस्टरवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे फोटो वापरण्याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला. आगामी जिल्हा परिषद निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.

मोर्चाच्या फलकावर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे फोटो का वापरण्यात आले, असा सवाल आमदार धस यांनी उपस्थित केला. या मतदारसंघात स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्यात आली होती आणि या प्रश्नाशी सरकारचा काही संबंध नसल्याचे सांगत, शासनाचा निषेध करणाऱ्या मोर्चाच्या फलकावर सत्ताधारी नेत्यांचे फोटो वापरणे कितपत योग्य आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

# पिंपरी घाटातील खूनप्रकरणी दोघांना चार तासांत अटक; आष्टी न्यायालयाकडून सहा दिवसांची पोलीस कोठडी

**आष्टी प्रतिनिधी**




अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे पिंपरी घाटा शिवारात बीड–अहिल्यानगर महामार्गालगत घाटामध्ये अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. या खूनप्रकरणाचा छडा लावत अंभोरा पोलिसांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या चार तासांत दोन आरोपींना अटक केली आहे. तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनीय बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी ही कारवाई केली.

दिनांक 25 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास पिंपरी घाटा शिवारातील महामार्गालगत घाटामध्ये अंदाजे 25 ते 30 वर्षे वयाच्या अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता. पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवत मृताची ओळख पटवली. त्यानंतर मृताच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंभोरा पोलीस ठाण्यात खून तसेच पुरावा नष्ट करण्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच अंभोरा पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी तांत्रिक विश्लेषणासह गोपनीय बातमीदारांचे जाळे सक्रिय केले. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी संदीप लल्लू सोनखर (वय 21) आणि भागवत जालिंदर आरे (वय 28), दोघेही रा. शिक्रापूर, पुणे यांना अवघ्या चार तासांत अटक केली. अटक केलेल्या दोन्ही आरोपींना आष्टी येथील न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत खुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अंभोरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे व त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास सपोनी विक्रांत हिंगे करीत आहेत.





# शेतकऱ्यांची व्यथा मांडत दुष्काळ जाहीर करून हेक्टरी लाखाची मदत द्या - ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांची मागणी

**परळी | वार्ताहर**

मराठवाड्यात यावर्षी पावसाने दडी मारल्याने शेतकरी पूर्णपणे होरपळून गेला आहे. पिके करपून गेली असून शेतकऱ्यांवर संकट आहे. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी शेतकऱ्यांची व्यथा मांडत सरकारकडे तातडीने मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे.

यावर्षी पाऊस नसल्याने शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे सरकारने मायबापाच्या भूमिकेतून तात्काळ सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत जाहीर करावी, अशी मागणी ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी मुख्यमंत्री साहेब व माजी मंत्री धनंजयजी मुंडे साहेब यांच्याकडे केली आहे.

पुढील काळ अधिक कठीण असणार आहे. पाणी टंचाई आणि चारा टंचाईची भीषण समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने आत्तापासूनच पाणी व चाऱ्याचे योग्य नियोजन करावे आणि पुढील दिवसांचे गांभीर्य लक्षात घेऊन शेतकऱ्यांकडे लक्ष द्यावे, असे आवाहनही कोकाटे महाराजांनी यावेळी केले आहे.

# जिल्हा परिषद शाळा टिकवण्यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी आवश्यक

## शालेय अभ्यासक्रमासोबत वर्षभर नियोजनबद्ध तयारी करा; आ. सुरेश धस यांचे शिक्षकांना आवाहन



**आष्टी |** जिल्हा परिषदेच्या शाळा या गोरगरीब, शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आधार आहेत. या शाळांचे अस्तित्व टिकवून त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवायची असेल तर शालेय अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी तयार करण्याशिवाय पर्याय नाही. शिक्षकांनी विद्यार्थ्यांची वर्षभर नियोजनबद्ध तयारी करून घ्यावी, असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड यांच्या 'निपुण बीड अभियानांतर्गत शालेय स्पर्धा परीक्षा-शिक्षक कार्यशाळे'चा अध्यक्षीय समारोप आ. सुरेश धस यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी व्यासपीठावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (योजना) डॉ. किरण कुंवर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रियाराणी पाटील, गटविकास अधिकारी प्रयाग ढमाळ, संतोष माने, भरत नागरे, गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, सिद्धांत कांबळे, प्रशांत शिंदे यांच्यासह स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक अनिता शरद परदेशी, संजय आनंद शिंदे, विनोद बबनराव झनक तसेच राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त शिक्षक देविदास दत्तात्रय महाले आदी मान्यवर उपस्थित होते.

आ. सुरेश धस म्हणाले की, इंग्रजी माध्यमाच्या शाळांपेक्षा मराठी माध्यमातून शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्याची जबाबदारी शिक्षकांनी स्वीकारली पाहिजे. केवळ परीक्षा जवळ आल्यानंतर अभ्यास घेण्याऐवजी पहिलीपासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी, नियमित सराव चाचण्या, घटकनिहाय नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या चुका शोधून त्यावर काम करण्याची गरज आहे.

'पालकांचा शिक्षकांवर विश्वास असतो; त्या विश्वासाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांच्या भवितव्याची जबाबदारी पार पाडा,' असे आवाहनही त्यांनी केले. बदलत्या काळानुसार अध्यापनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वापर करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

आष्टी तालुक्यातील शिष्यवृत्ती परीक्षेतील उल्लेखनीय कामगिरीचा उल्लेख करताना आ. धस यांनी वसुंधरा विद्यालयाच्या यशाचे विशेष कौतुक केले. पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यस्तरावर विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाचा उल्लेख करून अशीच गुणवत्ता गावोगावी असलेल्या जिल्हा परिषद शाळांमध्ये निर्माण व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्या तसेच शैक्षणिक कामाव्यतिरिक्त इतर कामांमध्ये शिक्षकांचा वेळ जात असल्याने त्याचा परिणाम अध्यापनावर होतो. शिक्षकांना अधिकाधिक वेळ शैक्षणिक कामासाठी मिळावा, यासाठी शासनदरबारी प्रभावीपणे पाठपुरावा करणार असल्याचेही आ. धस यांनी सांगितले.

कार्यशाळेत पुणे येथील सातवी शिष्यवृत्ती व NMMS परीक्षा मार्गदर्शिका अनिता शरद परदेशी, कोल्हापूर येथील चौथी शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक संजय आनंद शिंदे, वाशिम येथील नवोदय परीक्षा मार्गदर्शक विनोद बबनराव झनक आणि 'माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानात राज्यात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या साखरा, जि. वाशिम येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक देविदास दत्तात्रय महाले यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

अनिता परदेशी यांनी जिल्हा परिषद शाळा या विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आकार देणाऱ्या संस्था असून, ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात पुढे आणण्यासाठी शैक्षणिक गुणवत्ता आणि स्पर्धा परीक्षांची तयारी महत्त्वाची असल्याचे सांगितले.

संजय आनंद शिंदे यांनी भुदरगड तालुक्यातील शिष्यवृत्ती परीक्षेतील यशाची माहिती देत पहिलीपासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी, घटकनिहाय नियोजन, नियमित सराव आणि विद्यार्थ्यांच्या चुकांचे विश्लेषण या पद्धतींची माहिती दिली. देविदास महाले यांनी साखरा जिल्हा परिषद शाळेने प्रतिकूल परिस्थितीत केलेल्या गुणवत्तावाढीच्या प्रवासाची माहिती दिली.

यावेळी सोमनाथ वाळके यांनी प्रास्ताविक करत 'आमदार श्री शाळा' ही संकल्पना आष्टी विधानसभा मतदारसंघात राबविण्यात येत असून जिल्हा परिषद शाळांमधील तंत्रज्ञान विकासासाठी आ. सुरेश धस यांनी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली.

कार्यक्रमास उमाकांत बबनआप्पा काष्टे, नारायण गणेशराव गाडे, तसेच आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मनोरंजन धस यांनी आभार मानले, तर बाळासाहेब तळेकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन रानडे, अजित मुळे आणि नगरसेवक शरीफ शेख यांनी परिश्रम घेतले.

# मुक्या जीवासाठी माणुसकीचा झरा.. देऊळगाव घाट परिसरात बाबा ठोंबरे यांचा स्तुत्य उपक्रम

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**



देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड येथे अजून उन्हाळ्याची चाहूलही लागलेली नाही, सूर्याच्या किरणांनी उन्हाची तीव्रता धारण केलेली नाही; मात्र त्याआधीच देऊळगाव घाट परिसरात पाण्याअभावी मुक्या जनावरांची वनवण सुरू झाली आहे. पाण्याच्या शोधात गुरेढोरे रानावनात भटकू लागली आहेत. तहानलेल्या जीवांच्या डोळ्यांत पाण्याची आस आणि त्यांच्या पावलांत जगण्याची धडपड दिसू लागली आहे.अशा या कठीण प्रसंगी, मुक्या जीवांच्या वेदना जाणणारे आणि त्यांच्या तहानेची जाणीव ठेवणारे हरी ओम फुड्स कंपनी पनवेल यांचे सर्वेसर्वा बाबासाहेब ठोंबरे यांनी पुन्हा एकदा सेवाभावी कार्यासाठी पुढे सरसावले आहेत. देऊळगाव घाट च्या मोघदरा परिसरात यापूर्वी गुरांसाठी पहिली पानपोई सुरू केल्यानंतर, आता त्यांनी देऊळगाव घाट पठारावर दुसरी जनावरांची पानपोई सुरू करून माणुसकीचा झरा अखंड वाहता ठेवला आहे..मुक्या जनावरांच्या ओठांवर पाण्याचे दोन थेंब यावेत, त्यांच्या तहानलेल्या जीवाला क्षणभर का होईना दिलासा मिळावा आणि पाण्याच्या शोधात भटकणाऱ्या गुरांना जीवनदायी आधार मिळावा, या उदात्त भावनेतून बाबा ठोंबरे यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे.

ज्यांना आपली व्यथा शब्दांत सांगता येत नाही, ज्यांना तहान लागली म्हणून कुणाकडे मागणी करता येत नाही, अशा निराधार जीवांसाठी पाण्याची व्यवस्था करणे म्हणजे केवळ एक सामाजिक उपक्रम नव्हे, तर माणुसकीच्या हृदयातून उमटलेली करुणेची हाक आहे.देऊळगाव घाटच्या मातीमध्ये रुजलेली ही सेवाभावाची बीजे भविष्यात अनेकांच्या मनात संवेदनशीलतेचा अंकुर फुलवोत. बाबा ठोंबरे यांच्या या कार्यातून एक सुंदर संदेश समाजासमोर येतो माणसांची तहान भागवणारे अनेक हात असतात; पण मुक्या जीवांची तहान ओळखून त्यांच्यासाठी पाण्याची सोय करणारे हात खऱ्या अर्थाने माणुसकी जपतात!"पाण्याचा प्रत्येक थेंब एखाद्या मुक्या जीवासाठी जीवनाची आशा ठरू शकतो. म्हणूनच देऊळगाव घाट पठारावर सुरू झालेली ही दुसरी पानपोई म्हणजे केवळ पाण्याचे ठिकाण नाही, तर करुणा, दया आणि जीवमात्रांप्रती असलेल्या प्रेमाचा जिवंत झरा आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, सोमवार 28 सप्टेंबर 2026
Last page

# टोकवाडी-कन्हेरवाडी बायपासवरील रेल्वे पुलाचे काम पाच वर्षांनंतरही लालफितीत

## राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा हलगर्जीपणा चव्हाट्यावर

**(परळी प्रतिनिधी)**

परळी-बीड-अहमदनगर या बहुप्रतिक्षित रेल्वे मार्गाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असताना, परळीकरांसाठी अत्यंत कळीच्या ठरणाऱ्या टोकवाडी-कन्हेरवाडी बायपासवरील रेल्वे पुलाचे काम मात्र गेल्या पाच वर्षांपासून रखडले आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन अर्धे दशक उलटले तरी प्रत्यक्ष कामाची एक वीटही रचली गेलेली नाही. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) या अनास्थेमुळे परळी शहरावर वाहतुकीचा प्रचंड ताण वाढला असून, नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

बीड जिल्हावासीयांचे दशकांपासूनचे स्वप्न असलेला २६० किलोमीटरचा परळी-बीड-नगर रेल्वे मार्ग आता वेगाने पूर्णत्वाकडे जात आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी १७ सप्टेंबर रोजी बीड-पुणे रेल्वे सेवेचा शुभारंभ झाल्यानंतर वडवणीपर्यंतची यशस्वी चाचणीही पार पडली आहे. आता केवळ वडवणी ते परळी दरम्यानचा ६० किलोमीटरचा पट्टा शिल्लक आहे. असे असताना, परळीनजीक टोकवाडी बायपासवरील प्रस्तावित रेल्वे पुलाचे काम मात्र अद्याप सुरूच झालेले नाही. त्यामुळे अंतिम टप्प्यात असलेल्या या संपूर्ण रेल्वे प्रकल्पाला या पुलाच्या विलंबाचा मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे.

टोकवाडी-कन्हेरवाडी बायपास हा अंबाजोगाई, बीड आणि गंगाखेड या प्रमुख मार्गांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. पुलाअभावी बायपासवरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली असून, अंबाजोगाईकडे जाणाऱ्या वाहनांना शहरातून किंवा इतर पर्यायी ओव्हरब्रिजवरून लांबच्या मार्गाने वळसा घालावा लागत आहे. यामुळे प्रवाशांचा वेळ आणि इंधन तर वाया जातच आहे, शिवाय परळी शहरातील अंतर्गत वाहतूक व्यवस्थाही कोलमडून पडली आहे.

दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्वप्नातील हा रेल्वे प्रकल्प मार्गी लागत असताना, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या उदासीनतेमुळे या पुलाचा प्रश्न चिघळत चालला आहे. या संदर्भात महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता गणेश क्षीरसागर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.





### अपघात झाल्यास अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवणार — नितीन ढाकणे



"गेल्या अनेक वर्षांपासून हा पूल प्रशासकीय चालढकलीचा बळी ठरला आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या निष्काळजीपणामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आला असून दररोज परळीकरांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. या प्रलंबित कामामुळे भविष्यात कोणताही गंभीर अपघात घडून जीवितहानी झाल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर थेट सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करू," असा इशारा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष नितीन ढाकणे यांनी दिला आहे.

## परळीत खळबळ!

# परळी महावितरणचा कर्मचारी पंचांसमक्ष लाच स्वीकारताना रंगेहात पकडला

**वीज मीटर बसवण्यासाठी १३ हजारांची लाच !**

**वीज जोडणीसाठी लाचखोरी!**

## जालना 'एसीबी'ची धडक कारवाई; वरिष्ठ तंत्रज्ञ अरुण गिते पंचांसमक्ष जेरबंद

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

नवीन विद्युत मीटर बसवून वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी १५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती १३ हजार रुपये स्वीकारताना महावितरण कंपनीतील वरिष्ठ तंत्रज्ञाला जालन्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहात पकडले. या धडक कारवाईमुळे परळीतील शासकीय व निमशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

आरोपी अरुण सुरेश गिते (वय ३१ वर्षे, रा. माऊली नगर, परळी) हा महावितरण कंपनी, परळी वैजनाथ येथे वरिष्ठ तंत्रज्ञ (वर्ग-४) या पदावर कार्यरत आहे.

तक्रारदार यांचे घरचे विद्युत मीटर वीज बिल कट करून काढून नेण्यात आले होते. तक्रारदार MSEB ऑफिसात गेले असता, आरोपी अरुण गिते याने "तुमचे विद्युत मीटर फॉल्टी असून नवीन बसवून वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी १५,००० रुपये द्यावे लागतील" अशी लाचेची मागणी केली.


त्यानंतर, २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजून १० वाजेच्या सुमारास जिरगे नगर डीपी जवळ, सापळा रचण्यात आला. तक्रारदाराकडून पंचांसमक्ष १३,००० रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारताना आरोपी अरुण गिते याला एसीबीच्या पथकाने रंगेहात ताब्यात घेतले.

या प्रकरणी पोलीस ठाणे परळी शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

■ **एसीबीचा सापळा आणि रंगेहात कारवाई**

तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लागलीच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (जालना) कडे लेखी तक्रार नोंदवली. एसीबी पथकाने केलेल्या पडताळणीदरम्यान आरोपीने १५ हजार रुपयांवरून तडजोडीअंती १३ हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले.






ही यशस्वी कारवाई श्रीमती माधुरी कांगणे (पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग. छत्रपती संभाजीनगर) व शंतनू सिंगारे (अपर पोलीस अधीक्षक) यांच्या मार्गदर्शनाखाली

बी. एस. जाधवर (पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. जालना) पो.ह. गजानन घायवट, मनोहर भुतेकर, गजानन कांबळे, शिवलिंग खुळे, व कापसे यांनी पार पाडली.

■ **जनतेस आवाहन**

कोणताही शासकीय किंवा निमशासकीय अधिकारी/कर्मचारी कामासाठी लाचेची मागणी करत असल्यास नागरिकांनी न घाबरता तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी (ACB) संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# पाण्याच्या हक्कासाठी बीडमध्ये २८ सप्टेंबरला जनआक्रोश मोर्चा

### आष्टी-पाटोदा-शिरूरच्या माजी आमदारांची हाक; हक्काचे पाण्याची मागणी

### माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**आष्टी |** आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का.) मतदारसंघातील पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीच्या प्रश्नावर आता बीडमध्ये जनआक्रोश व्यक्त होणार आहे. पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, दुष्काळग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना तातडीने मदत द्यावी, या मागण्यांसाठी सोमवारी, २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर 'दुष्काळी जलहक्क जनआक्रोश मोर्चा' काढण्यात येणार आहे. माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली हा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे.

आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का.) तालुक्यांतील शेतकरी, नागरिक आणि सर्वसामान्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. 'चलो बीड! पाण्याच्या हक्कासाठी जनआक्रोश!' आणि 'पाणी द्या, जीवन द्या!' अशा घोषणांसह हा लढा उभारण्यात येणार असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे.

कृष्णा आणि गोदावरी खोऱ्यातील हक्काचे पाणी या भागाला तातडीने





उपलब्ध करून द्यावे, ही मोर्चाची प्रमुख मागणी आहे. नदी जोड प्रकल्पांतर्गत आष्टी-पाटोदा-शिरूरसाठी कायमस्वरूपी पाण्याची व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. मतदार मतदारसंघातील केटीवर बंधाऱ्यांची दुरुस्ती करून ग्रामीण जलसिंचनाला बळकटी द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

कुकडीचे पाणी सिना आणि मेहकरी तलावात सोडण्यासाठी कायमस्वरूपी पाणी रोटेशन निश्चित करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांचे तातडीचे अनुदान द्यावे, अशी मागणी मोर्चाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

जनावरांच्या चारा-पाण्याच्या प्रश्नावरही आयोजकांनी भूमिका मांडली आहे. मोठ्या जनावरांसाठी दररोज १०० रुपये आणि लहान जनावरांसाठी ५० रुपये अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करावे, अशी मागणी आहे. पाणीटंचाईच्या काळात टँकर व्यवस्थेसाठी निविदा प्रक्रिया न राबवता संबंधित ग्रामपंचायतींना थेट टँकर मंजुरीचे अधिकार द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी भूमिका आयोजकांनी घेतली आहे. पाण्याच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष वेधण्यासाठी शेतकरी, नागरिक आणि सर्वसामान्यांनी मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी केले आहे.

**या आहेत ठळक मागण्या**

१. आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का.) तालुक्यांना कृष्णा व गोदावरी खोऱ्यातील हक्काचे पाणी तातडीने उपलब्ध करून द्यावे.

२. नदी जोड प्रकल्पांतर्गत आष्टी-पाटोदा-शिरूरसाठी कायमस्वरूपी पाण्याची व्यवस्था करावी.

३. मतदार मतदारसंघातील केटीवर बंधाऱ्यांची दुरुस्ती करून ग्रामीण जलसिंचनाला बळकटी द्यावी.

४. कुकडीचे पाणी सिना व मेहकरी तलावात सोडण्यासाठी कायमस्वरूपी पाणी रोटेशन निश्चित करावे.

५. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांचे तातडीचे अनुदान द्यावे.

६. मोठ्या जनावरांसाठी दररोज १०० रुपये आणि लहान जनावरांसाठी ५० रुपये चारा-पाणी अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करावे.

७. टँकर व्यवस्थेसाठी निविदा न काढता संबंधित ग्रामपंचायतींना थेट टँकर मंजुरीचे अधिकार द्यावेत.

## अल्प पावसामुळे आष्टी तालुक्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती; जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

**आष्टी (प्रतिनिधी)** : आष्टी तालुक्यात यंदा अल्प प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्याने चारा व पाणी टंचाईसह शेतकरी आणि पशुधन मालकांसमोर निर्माण झालेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांनी गुरुवारी (दि. २५) आष्टी तालुक्याचा दौरा करून विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत पिकांची स्थिती, पीक नुकसान तसेच पशुधनासाठी चाऱ्याच्या उपलब्धतेबाबत माहिती घेतली.

जिल्हाधिकारी जॉनसन यांनी सर्वप्रथम चिंचपूर येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. त्यानंतर चिंचपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट



देऊन पाहणी केली. पुढे आष्टा शिवारात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधत पिकांची परिस्थिती जाणून घेतली. पोखरी येथील शेतशिवारातही त्यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन पीक नुकसानीची पाहणी केली. त्यानंतर पांढरी येथे शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी करून आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणात असलेल्या दुग्ध व्यवसायाच्या पार्श्वभूमीवर जनावरांच्या चारा प्रश्नावर उपाययोजनांची माहिती घेतली. पांढरी येथील मुक्त जनावरांचा गोठा कशा पद्धतीने सांभाळला जातो, याचीही त्यांनी प्रत्यक्ष गोठ्यावर जाऊन पाहणी केली.

त्यानंतर आष्टी तहसील कार्यालयात जिल्हाधिकारी जॉनसन यांनी आमदार सुरेश (अण्णा) धस यांच्याशी दुष्काळसदृश्य परिस्थिती, जनावरांच्या चारा छावण्या आणि चारा डेपो याबाबत चर्चा केली. यानंतर त्यांनी आष्टी तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेत दुष्काळसदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या सूचना दिल्या.